## पवना जल विद्युत केंद्र १८ वा वर्धापनदिन

दिनांक ११.०६.२००९ रोजी पवना जलविद्युत केंद्राचा १८ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्या अनुषंगाने दि. १०.०६.२००९ रोजी एक छोटासा स्नेहमेळावा पवना सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आला. त्यावेळी श्री. नेवासकर, श्री. शिंदे, श्री. खांदेभराड तसेच उपस्थित कर्मचारी / कुटंबीय व आमंत्रित यांनी भावगीत, भजन, चित्रपटगीते चांगल्या प्रकारे सादर केली. विशेष म्हणजे पवना येथील कारागीर ब पदावर काम करणारे श्री. शेलूडकर यांनी शीळ वाजवून "अे मेरे वतनके लोगो " हे पूर्ण गीत सादर करुन वातावरण मंत्रमुग्ध केले. दि. ११.०६.२००९ रोजी सत्यनारायण पूजा व यंत्रपूजा झाली. महिलांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमासाठी जल विद्युत मंडळ पुणे कार्यालयाचे अधीक्षक अभियंता श्री. जाधव , कार्यकारी अभियंता, श्री. सूर्यवंशी व पानशेत जल विद्युत केंद्राचे कार्यकारी अभियंता श्री. करकरे तसेच सेवानिवृत्त श्री. शिंदे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. कुंभार, श्री. वाडकर, सौ. प्रतिभा रणनवरे, श्री. जोनवाल, श्री. साळुंके यांनी भरपूर मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

## "दीपनगर केंद्रात प्रशिक्षण उपकेंद्राचे उद्घाटन"

दि. २९.०६.२००९ रोजी भुसावळ औ. वि. के. दीपनगर येथे प्रशिक्षण उपकेंद्राचे उद्घाटन श्री. व्ही. एस. पाटील , मुख्य महाव्यवस्थापक ह्यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी आपल्या मार्गदर्शन भाषणातून उपस्थितांना आवाहन केले की, सर्वांनी यांचा लाभ घ्यावा. काम करीत असताना येणाऱ्या अडचणी, प्लॉन्टचे प्रॉब्लेम व त्यावर तोडगा काढणेसाठी प्रशिक्षण केंद्रातर्फे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्याप्रसंगी प्रभारी महाव्यवस्थापक श्री. व्ही. पी. खाडीलकर यांनी सांगितले की माईकवर किंवा स्टेजवर बोलायचं म्हटलं की मनात एक धडकी भरते, हात पाय थरथरतात जर प्रत्येकांनी या माध्यमातून प्रयत्न केल्यास ती भीती घालवण्यासाठी सुध्दा या प्रशिक्षणाचा केंद्राचा उपयोग करता येईल. वरील उद्घाटन प्रसंगी केंद्रातील अधीक्षक अभियंता श्री. बुरडे, श्री. जाधव, श्री. चंद्रागडे, श्री. देशमाने, श्री. सी. आर. पाटील तसेच सर्व विभाग प्रमुख हजर होते. प्रशिक्षण घेण्यासाठी २०-२५ कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी प्रशिक्षक म्हणून श्री. प्रविण बुटे (दु. अ.) उपस्थित होते. त्यांनी ERP - SAP व Kaizen Technique या दोन विषयावर प्रशिक्षण दिले.

## Want to be good manager? Then few tips for you,

- Has time to listen to his subordinates and colleagues.
- Respects each member of his team
- Never expects others to follow rules which he himself doesn't follow
- Has excellent communication skills
- Takes responsibility
- Does not pretend to be an expert on what he is not
- Never repeats a rumor that would heart someone's reputation
- Knows how to dress, on the job and off the job - understands appropriate attire for business
- Answers all invitation promptly, either by writing or calling
- Is punctual or if delayed, always informs in advance that he will be late
- Picks up the bill at the restaurant, when it is his turn without overtly miserly

**R.S.Kharul**
A.P.O. (Claims) H.O. Mumbai

भुसावळ औ. वि. कें. दीपनगर येथे कार्यरत असलेले श्री. प्रविण बुटे ह्यांनी अत्यंत साध्या सोप्या आणि ओघवत्या शैलीत ERP - SAP आणि Kaizen Technique ह्या विषयावर दोन सत्रांमध्ये उपयुक्त माहिती दिली तसेच मुख्य महाव्यवस्थापक श्री. व्ही . एस. पाटील ह्यांचे सुचनेनुसार इंटरनेट / ई मेल सुविधा सर्व कर्मचाऱ्यांपर्यत पोहचवावी ह्या उद्देशाने उपस्थित प्रशिक्षणार्थीना इंटरनेट / ई मेल ची माहिती सुध्दा प्रात्यक्षिकांसह देण्यात आली.

प्रशिक्षणाच्या बाबत सर्व प्रशिक्षणार्थीनी समाधान व्यक्त केले, तसेच अश्या प्रकारचे प्रशिक्षण इतरांसाठीसुध्दा आयोजित करण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. ह्या कार्यक्रमासाठी विभागाचे श्री. ए. एस. जाधव (उप. का. अभियंता), श्री. पी. आर. ताटवे (स. अ.) आणि कु. स्नेहा घोडमारे (क. अ.) ह्यांनी केलेल्या उत्तम आयोजना बाबत उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.